दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ

dainiklokaarambh@gmail.com | LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार ३१ मे २०२५ | अंक १६८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


संकटे आपल्याला अधिक सक्षम बनवतात


SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007 | All TOURS घर से घर तक | दिल से दिल तक | I'TIME in TRAVEL INDUSTRY | www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555


# ढेकळांचे पंचनामे करायचे का? कृषीमंत्री कोकाटेंचं वक्तव्य



नाशिक : कृषीमंत्री माणिकराव कोकाटे नेहमी आपल्या वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत असतात. आता पुन्हा कोकाटेंचं वादग्रस्त वक्तव्य समोर आलं आहे. कापणी झालेल्या पिकांचे पंचनामे करुन काय करणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच ढेकळांचे पंचनामे करायचे का? असे वादग्रस्त विधान मंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले आहे. अवकाळी पावसामुळे राज्यात पिकांचे नुकसान झाले आहे. कृषीमंत्री या नात्याने माणिकराव कोकाटे नाशिकमध्ये अवकाळीमुळे नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करण्यासाठी गेले. त्यावेळी कापणी झालेल्या पिकांचे पंचनामे करून काय करायचे ? ढेकळांचे पंचनामे करायचे का ? असे वादग्रस्त वक्तव्य त्यांनी केले. घरात आणून ठेवलेल्या मालाचे पंचनामे होणार नाहीत, ते नियमात बसत नाही. शेतात नुकसान झालेल्या पिकांचे रीतसर पंचनामे केले जातील असं कोकाटे यांनी स्पष्ट केलं अवकाळीमुळे झालेल्या नुकसानीनंतर कोकाटे यांनी पाहणी केली. अधिकारी केवळ उभ्या पिकांचे पंचनामे करत आहेत. या तक्रारीवर कोकाटे यांनी वक्तव्य केलं आहे. कापणी झालेल्या पिकांचे पंचनामे करुन काय करायचे?, आता ढेकळांचे पंचनामे करायचे का? असा सवालही कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केला आहे. कोकाटेंच्या वक्तव्याने नवा वाद? दरम्यान, मागील आठवडाभरात महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे राज्यातील अनेक भागांतील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतात उभ्या असलेल्या पिकांना मोठा फटका बसला आहे. कांदा, आंबा, भुईमूगाच्या शेंगा यांसारख्या महत्त्वाच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले

### नेमकं काय म्हणाले माणिकराव कोकाटे?

यावेळी पत्रकारांशी बोलताना माणिकराव कोकाटे यांनी वादग्रस्त वक्तव्य केले आहे. यावेळी पत्रकारांनी नुकसानीच्या संदर्भात विचारले असता नुकसानीचे पंचनामे सुरू असल्याची माहिती माणिकराव कोकाटे यांनी दिली. तर शेतकऱ्यांचे असे म्हणणे आहे की, उभ्या पिकांचे पंचनामे केले जात आहेत, असे विचारले असता माणिकराव कोकाटे म्हणाले की, हार्वेस्टिंग झालेल्या पिकांचे पंचनामे करून काय होणार? ढेकळांचे पंचनामे करायचे का? जे कांदे वावरात आहेत, त्यांचेच पंचनामे होतील. जे घरात आणून ठेवले, त्यांचे पंचनामे होणार नाहीत. त्याचे पंचनामे करणे अवघड आहे. ते नियमात बसत नाही, असे त्यांनी म्हटले. दरम्यान, शेतात जी काही पिके असतील

# डिस्ट्रिक्ट कलेक्टर फेलो नियुक्ती बाबत निवेदन

बीड दि. 30 :- जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन 2025-26 योजनांअंतर्गत खर्चाची परिणमता, उपयोगिता तपासण्यासाठी वेळो वेळी योजनांचे मुल्यामाप, सनियंत्रण,माहितीचे संकलन, विश्लेषण व माहितीची अज्ञावलीचे अद्यावतीकरण करण्याची अत्यंत आवश्यकता असल्याने वरील बाबीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासाठी दोन (कंत्राटी) Diistrict Collector Feiiow पदाची नेमणूक करावयाची आहे. यासाठी खालीलप्रमाणे दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी तत्वावर पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करावेत.

**पात्रता**

एम.ए,एम.एस.सी,एम.एस.डब्ल्यू,एम.टेक.,एम.बीए विकास क्षेत्र,एनजीओ,सीएसआर,आयटी डोमेन क्षेत्रात किमान 2 वर्षांचा अनुभव, शक्यतो सरकारी सेटअपमध्ये.ब्लॉक आणि जिल्हा प्रशासनाची चांगली समज मायक्रोसॉफ्ट वर्ड, एक्सेल आणि पॉवरपॉइंटमध्ये प्रवीण सरकारी विभागांच्या रचनेची आणि कामकाजाची पूर्वीचा अनुभव/परिचितता विकास क्षेत्राची चांगली समज बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात राहण्याची आणि प्रवास करण्याची इच्छा. इंग्रजी आणि मराठी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे. प्रमुख जबाबदाऱ्या

जिल्ह्यातील ओळखल्या जाणाऱ्या आव्हानांना किंवा संधींना तोंड देण्यासाठी धोरणे, कृती योजना आणि शिफारसी विकसित करा आणि अंमलात आणा. राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांच्या ठिकाणांचे निरीक्षण आणि क्षेत्रीय भेटी योजनांचे विश्लेषण आणि अंमलबजावणीमध्ये जिल्हा प्रशासनाला मदत करणे.सादरीकरणे, अहवाल आणि इतर संप्रेषण साहित्य तयार करा आणि वितरित करा.आयटी प्रणालींच्या सुरळीत कामकाजात जिल्हा प्रशासनाला सहकार्य करणे.जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियुक्त केलेली इतर कर्तव्ये जिल्ह्यातील विविध विभाग, सीएसआर आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये समन्वय आणि संपर्क सुलभ करणे.

ही पदे भरण्यासाठी https://beed.gov.in/ या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून शैक्षणिक अर्हता व अर्ज करावयाच्या पध्दतीमध्ये इच्छुक उमेदवारांनी आपला ऑनलाईन अर्ज https://docs.qie.com/forms/d/1FAipqLSfqFcUwcMjloTYMoiEftw6jpc80ecekH14DL5s9fqfsyoL1q/viewform या लींकवर भरावा सदरील पदासाठी अर्ज स्विकारण्याचा अंतिम दि. 10 जून 2025 रोजी सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत राहील. त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकृत करण्यात येणार नाहीत किंवा विचारात घेतले जाणार नाहीत. अर्ज सादर करतांना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास career.dcbeed@gmail.com या मेलवर करावा.

*****

# सतरंजीने हायपाय बांधून मारले, पैसेही लुटले; बीडच्या एसपीकडून टोळीवर मोक्का, चौघांना अटक

बीड : जिल्ह्यातील गुन्हेगारी कारवायाच्या घटनांवर पोलिसांकडून कडक कारवाई केली जात आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणानंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. त्यानंतर, राज्य सरकारने या घटनेची गंभीर दखल घेत येथील पोलीस अधीक्षकांची बदली केली. त्यामुळे, येथे नवनीत कावत या नव्याने पदभार स्वीकारलेल्या पोलीस अधीक्षकांकडे बीडची जबाबदारी देण्यात आली. कावत यांनी बीडमधील गुन्हेगारांवर वचक बसवत थेट मोक्काअंतर्गत कारवाईला सुरुवात केली आहे. वाल्मिक कराड आणि गँगवर मोक्का लावल्यानंतर आता केज तालुक्यातील विडा येथे अवादा पवनचक्की कंपनीच्या वॉचमनला मारहाण करणाऱ्या



टोळीवर देखील मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. बीड पोलिसांनी येथील वॉचमला मारहाण करत चोरी टकरणाऱ्या टोळीवर मोक्काअंतर्गत कारवाई केली आहे. ७ एप्रिल रोजी वॉचमन अभिजीत दुनघव या वॉचमनला सतरंजीने हात पाय बांधत रोटर केबल, स्टार्टन केबल, अर्थिंग केबल असे एकूण १२ लाख ८७ हजार रुपयांच्या साहित्याची चोरी केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आता या प्रकरणातील आरोपी बबन सरदार शिंदे, धनाजी रावजी काळे, मोहन हरी काळे, लालासाहेब सखाराम पवार असे ४ आरोपी पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांना न्यायालयासमोर हजर केले होते. तसेच या गुन्ह्यात इतर ६ आरोपी निष्पन्न झाले असून ते अद्याप फरार आहेत, पोलीस त्यांचा शोध घेत आहे. या सर्व आरोपींच्या विरोधात बीड व धाराशिव जिल्ह्यात संघटित रित्या केज, नेकनूर, ढोकी, वाशी या पोलीस ठाण्याच्या हद्दीत ११ गुन्हे केल्याचे समोर आले आहे. त्यामध्ये दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, गंभीर दुखापत यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे, आता या टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे.

# बीड जिल्ह्यातील पाचव्या गुन्हेगारांच्या टोळीवर मोक्का

बीड जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबादित राखण्यासाठी बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत, बीड जिल्हयातील गुन्हेगारीचे व गु ंडगिरीचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चउजउ- व चझ्रऊ- व कलम ५५,५६.५७ मपोका अन्वये बऱ्याच गुन्हेगारांवर व गु ंडावर कार्यवाही करण्याचा धडाका बीड जिल्हाचे पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली बीड पोलीसांनी सुरु ठेवला आहे. जनतेच्या जिविताचे व मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी जिल्हयात चोऱ्या, दरोडे, घरफोड्या, खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडयाची तयारी, बलात्कार, जुलुमाने घेणे, पळवून नेणे, खंडणी मागणे या व अशा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांविरुध्द ठोस कारवाई करण्यासाठी बीड जिल्हयातील पोलीस जिल्हयातील व जिल्हाचे बाहेरील गुन्हेगारावर करडी नजर ठेऊन आहेत. फिर्यादी नामे आकाश भास्कर जाधव वय २६ वर्षे व्यवसाय खाजगी नौकरी, वॉचमन अवादा कंपणी मस्साजोग रा. विडा ता. केज जि. बीड यांनी फिर्याद दिली की, दिनांक. ०७/ ०४/२०२५ रोजी रोजी सायंकाळी ०७.०० वाजता मी सोबत अभिजीत दुनघव असे मौजे विडा शिवारात आवादा कंपनीने कामावर वॉचमन म्हणून काम करत असतांना रात्री, अंदाजे ११.४५ वाजेच्या सुमारास तेथे अनोळखी १४ लोक चालत आले त्यावेळेस मी व अभिजीत दुनघव यांनी त्या अनोळखी लोकांना तुमचे इकडे काय काम आहे असे म्हणताच त्यातील चार लोक आमचे जवळ आले, त्यांच्या हातातील लाकडी दांडयाने आम्हांला मारहाण करुन जखमी केले. त्यातील चारपैकी दोघे सडपातळ होते व दोघे जाड होते. त्यांनी बाजुला पडलेल्या सतरंजीच्या पट्टीने त्यातील दोन लोकांनी माझे व इतर दोन लोकांनी अभिजीत दुनघव यांचे हात पाय बांधले व इतर १० लोक हे आवादा कंपनीचे चालु असलेल्या पवनचक्कीच्या पाईप मधुन लोखंडी शिडीवर चढले व जबरदस्तीने खालील वर्णनाचा माल १) रोटर केवल २,००,०००/-रु २) स्टार्टन केबल ८,११,०००/ रु ३) अर्थाग केबल २,७६,०००/- असे एकुण १२,८७,०००/- रु. चा माल चोरुन नेला आहे.

# उड्डाणपूल दुरुस्ती मात्र परळीकरांची गैरसोय

परळी / प्रतिनिधी परळी शहराचा वाढता विस्तार आणि दोन भागांना जोडणारा महत्वाचा दुआ असलेल्या डॉ. शामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूल हा दुरुस्तीसाठी तब्बल एक महिनापेक्षा अधिक काळ बंद राहणार आहे. शहरातील शिवाजीनगर , अशोकनगर, आंबेडकर नगर, थर्मल कॉलनी या भागातील लोकांसाठी दैनंदिन प्रश्नासाठी शहरात ये-जा याच उड्डाणपुलावरून होत असल्याने प्रशासनाने पूर्वीचा उड्डाणपूल खालील पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्यावा अशी रास्त मागणी परळीकर करत आहेत. मागील अनेक वर्षांपासून परळी मधील रेल्वे उड्डाणपूल दुरूस्ती करण्यासाठी मागणी होत होती. शहराचा वाढता विस्तार पाहता अर्धे शहर उड्डाणपुलाच्या पश्चिम दिशेला तर अर्धे शहर पूर्व दिशेला वसले आहे. दैनंदिन अनेक कामांसाठी परळीकरांना याच उड्डाणपुलाचा आधार घेऊन प्रवास करावा लागतो.औष्णिक वीज निर्मिती केंद्र वसाहत या ठिकाणी असलेल्या अनेक नामांकित शाळेत हजारो विद्यार्थी याच उड्डाणपुलावरून ये-जा करत असतात.या सर्व विदारक परिस्थितीत शहराला दोन भागाला जोडणारा उड्डाणपूल खालील पूर्वीचा मार्ग हलक्या वाहनांसाठी सुरू आवश्यक आहे. उड्डाणपूल हा मार्ग दुरुस्ती कामासाठी तब्बल एक महिना पेक्षा अधिक काळ बंद राहणार असल्याने थर्मल कॉलनी, शिवाजी नगर, अशोक नगर आदी भागातील नागरिकांना तब्बल १० किलोमीटर लांबून वळसा घालून शहरात ये जा करावी लागणार आहे. पावसाळ्याचे दिवस असून विद्यार्थ्यांच्या शाळा, गृहिणींना बाजारहाट, नोकरदार व्यावसायिक वर्ग तथा रुग्णांना दवाखान्यात जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे.त्यामुळे प्रशासनाने हलक्या वाहनांसाठी उड्डाणपूल खाली पूर्वीचा मार्ग हा तात्पुरता स्वरूपात तात्काळ सुरू करावा अशी मागणी परळीकर करत आहेत.

## २३ जुलै १९८९ सारखी बीडमध्ये महापुराची दुर्घटना घडली तर नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासन जबाबदार

# विभागीय आयुक्तांनी २ वेळा मुख्याधिकारी यांना बिंदुसरा नदीपात्रातील अतिक्रमण प्रकरणी ठोस कारवाईचे आदेश देऊनही जाणिवपूर्वक दुर्लक्ष :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.३० )यावर्षी मान्सुनपुर्व झालेल्या अतिवृष्टीमुळे बिंदुसरा धरण पुर्ण क्षमतेने भरून ओसंडून वाहू लागले आहे.येत्या पावसाळ्यात पावसाची आवक वाढल्यानंतर बिंदुसरा नदीला पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असुन दि.२३ जुलै १९८९ सारखा बिंदुसरा नदीला महापुर येऊन ३५ वर्षांपूर्वी घडलेली दुर्दैवी घटना घडु शकते.नदीकाठच्या वस्तिंना मोठ्या प्रमाणात हानी पोहोचली होती.गेल्या ३ वर्षांपासून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, युनुस शेख,सुदाम तांदळे यांनी वारंवार लेखी निवेदन तसेच आंदोलनाद्वारे बिंदुसरा नदीपात्रात भुमाफियांचे अतिक्रमणाचे प्रमाण वाढलेले असुन नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाचा याला छुपा पाठिंबा असुन नदीपात्रात कच-यांचे ढीग, भर घालुन त्यावर प्लाटींग करणे, रस्ते बनविणे, बांधकाम करणे असे सर्रास प्रकार आढळून आले. संबंधित प्रकरणात विभागीय आयुक्तांकडे लेखी तक्रार केल्यानंतर त्याअनुषंगाने सहाय्यक आयुक्त गट अ नगरपरिषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद डॉ.निलम पाटील यांनी दि.२९ मे आणि दि.२८ जुन २०२३ अशा २ वेळा मुख्याधिकारी नगरपरिषद बीड निता अंधारे यांना बिंदुसरा नदीपात्रात भराव घालून नदीपात्राचे मैदान करून ओढे चक्क बुजवुन नदीचा प्रवाह वळवुन करण्यात आलेल्या अनाधिकृत बांधकाम प्रकरणी ठोस कारवाई करण्याचे आदेश देऊनही मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांनी आणि जिल्हा प्रशासनाने जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे भविष्यात जर बिंदुसरा नदीला आलेल्या पुरामुळे जिवितहानी अथवा वित्तहानी झाली तर याला सर्वस्वी नगरपरिषद



प्रशासन आणि जिल्हा प्रशासन जबाबदार असणार आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात फौजदारी कारवाई आणि नुकसान भरपाई जबाबदार अधिकाऱ्यांकडून घेण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि रामनाथ खोड यांनी केली आहे.

### पुराचा धोका ओळखून उपाययोजना करण्यापेक्षा भुमाफियांची तळी उचलण्यात नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासनाने धन्यता मानली :- डॉ.गणेश ढवळे

१९८९ चा बिंदुसरा नदीला आलेला पुराचा मागील अनुभव पाहता नगरपरिषद प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि पाटबंधारे विभाग यांना वारंवार पुर नियंत्रण रेषा ( निल रेषा,लाल रेषा) आखणी करण्यात यावी. संरक्षक भिंतीचा अभाव, नदीपात्रात व शेजारी अनेक अतिक्रमित ईमारतीची बांधकामे करण्यात आलेली आहेत.तर फुलाई नगर मधील बिंदुसरा नदीपात्रात सिमेंटची भिंत बांधून नदीचा प्रवाह वळविण्यात आलेला आहे आणि संबंधित प्रकरणात वारंवार तक्रारी व आंदोलनानंतर सुद्धा नगरपरिषद व जिल्हा प्रशासन आपापले स्वार्थ साधून भुमाफियांशी संधान बांधून आहेत त्यामुळे आज बीडकरांचा जीव टांगणीला लागलेला असल्याची उद्विग्न प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ३१ मे २०२५
https://lokaarambh.com




संपादकीय

# वारी' वारकरी संप्रदायाचा प्राण

संप्रदायाचे नाव करकरी असे आहे. वारकरी म्हणजे काय, याचा विचार करायला हवा. वारकरी म्हणजे जो वारी करतो तो. पंढरपूरची, विठ्ठलाची वारी करतो तो. 'वारी' या शब्दाचे वार हे संक्षिप्तरुप होऊन वारकरी असे रुप झालेले आहे. आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी या पंढरपूरच्या महत्वाच्या वा-या, यांपैकी कोणत्याही एका शुध्द एकादशीस गळ्यात तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपुरास जातो तो 'पंढरपूरचा वारकरी' म्हटला जातो. वारी हा वारकरी संप्रदायाचा प्राण आहे, त्याचा तो पारिभाषिक शब्द आहे. विठ्ठलाची वारी करणारा तो वारकर-वारकरी. जो भाग्यवान व जो 'काया वाचा मने जीवे सर्वस्वे उदार । बाप रखुमा देवीवर विठ्ठलाचा वारकरी ॥' असे संत ज्ञानदेव म्हणतात, तर 'आले आले रे हरीचे डिंगर । वीर वारकरी पंढरीचे ॥' असे संत नामदेवांनी वर्णन केले आहे. वारकरी म्हटला की तो पंढरीचाच असा एक विशिष्ट अर्थ त्या शब्दास प्राप्त झाला आहे. पंढरीची वारी करणे, ही केवळ बाम्ह्योपाधी नाही, तर ती अःतरीची ऊर्मी आहे. 'जाय जाय तू पंढरी । होय होय वारकरी ॥' हे तुकोबांचे वजन या दृष्टीने ध्यानात घ्यावे. सारांश, वारी ही वारक-यांची ऊर्मी आहे. म्हणून संप्रदायाचे नामाभिधान वारकरी संप्रदाय असे झाले आहे. या संप्रदायाला 'भागवत धर्म' असेही म्हणतात. या संप्रदायास भागवत धर्म म्हणण्याचे कारण या संप्रदायाचे उपास्यदैवत श्रीविठ्ठल हे श्रीकृष्णाचे बाळरुप समजले जाते व हा ग्रंथ गीतेप्रमाणेच श्रीमदभागवत या ग्रंथासही पूजनीय मानतो. गीता व भागवतात सांगितलेली श्रेष्ठ प्रेमभक्ती व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनात उदित होऊन योग्य रीतीने विकसित व्हावी, हे वारकरी संप्रदायाचे उद्दिष्ट आहे. भागवत धर्म हा स्वतःला प्रिय म्हणून भगवंताने स्वतःच्या मुखाने सांगितला. अर्थात हा भागवत धर्म हा इतर द्वैती भागवत धर्मापेक्षा निराळा आहे. हा धर्म पूर्णपणे अद्वैती धर्म आहे. वारकरी संप्रदायाचे दैवत : विठ्ठल - श्रीविठ्ठल हे वारकरी संप्रदायाचे आराध्यदैवत असल्याचे या पूर्वी पाहिलेच आहे. श्री संत ज्ञानदेव व श्री संत नामदेव यांच्या कालखंडाच्या पूर्वीपासून श्रीक्षेत्र पंढरपूर व श्रीविठ्ठल या दैवताची स्थापना झाल्याचे उल्लेख मिळतात. 'हे नव्हे आजिकालीचे । युगा अठ्ठाविसांचे ॥' हे ज्ञानदेवांचे प्रमाण किंवा 'युगे झाली अठ्ठावीस । अजून न म्हणसी बैस ॥' हे तुकोबांचे प्रमाण यामुळे क्षेत्र व दैवत याच्या प्राचीनत्वाचा बोध होतो. श्रीविठ्ठल या दैवताबद्दल दोन अंगांनी माहिती मिळते- एक अंग म्हणजे सर्व संतांची प्रमाण वचने व दुसरे अंग पुराणग्रंथ, ऐतिहासिक दाखले व शिलालेख. आपल्या या लाडक्या दैवताचे स्वरुप समावून घेतांना संतांपुढे अनेक द्वैती प्रश्न उपस्थित होतात. पण त्या द्वैताला आपल्यामध्ये सामावून घेणारे हे अद्वैती असे गोविंदरुप आहे, असा निष्कर्ष काढतात. ज्ञानदेवांचा असा अभंगच आहे. ज्ञानदेव म्हणतात : तुज सगुण म्हणों की निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंद रे ॥.,, तुकोबाही श्रीविठ्ठलाला पंढरीराव, पांडूरंग, विठोबा, विठाबाई, विश्वंभर, नारायणा, गोपाळ, गोपाळा, केशव, गोविंद, कमळापती, हरि, रखुमादेविवरा या नावांनी पुकारतात व अखेरीस ''तुका म्हणे जे जे बोला । ते ते साजे या विठ्ठला ॥'' असा निष्कर्ष काढतात. सर्वच संतांनी श्रीविठ्ठलाला भरभरुन गायलेले आहे. महती सांगितली आहे. त्यांच्या दृष्टीने सर्वस्व असलेला हा श्रीविठ्ठल पुंडलिकमुनीमुळे पंढरपुरात आला. भक्त पुंडलिक व श्रीविठ्ठल यांनी परस्परांच्या अंतःकरणातील गुज परस्परांना सांगितले व तेव्हापासून श्रीविठ्ठल व त्यांचे असंख्य भक्त यांच्याकडून त्या गुजांचे पालन अठ्ठावीस युगे चाललेले आहे. पुंडलिक गुज होते : म्हणे पुंडलिक देवा शिरोमणी । परिसावी विनवणी एक माझी ॥१॥ संसारबंधन तोडी रे दारुण । हें एक मागणें तुजपाशीं ॥२॥ ऋध्दिसिध्दी मोक्षसंपत्ती विलास । सांडियेसी आस त्यांची जीवें ॥३॥ पंच महापातकी विश्वासघातकी । त्यासी यमादिकीं गांजियिलें ॥४॥ ऐसिया पतीता करीं रे सनाथ । पुरवीं माझें आर्त पंढरिराया ॥५॥ हेंचि माझें काज अंतरींचे गुज । उध्दारी सहज महादोषी ॥६॥ नामा म्हणे वर दिला नारायणे । विठ्ठरदर्शने मोक्ष जीवा ॥७॥ ( ९७२ ) तर विठ्ठलाचे गुज आहे : देव गुज सांगे पंढरीस जा रे । प्रेमें चित्तीं घ्या रे नाम माझें ॥ आषाढी कार्तिकी विसरु नका मज । सांगतेस गुज पांडूरंग ॥ ( १०२६ ) श्रीविठ्ठलाशीपुंडलिकांचा हा संवाद सहजासहजी झाला नाही, ज्ञानदेव म्हणतात,त्याप्रमाणे ''जन्मोजन्मींच्या सायासी । विठ्ठल लाधला पुंडलिकासी ॥'' पुंडलिकाला हा श्रीविठ्ठल कसा साधला? संतवचनांच्या प्रमाणांनुसार पुंडलिक हा मातृपितृभक्त होता. त्याच्या भक्तीचे लोण वैकुंठापर्यंत पोचले. अशा भक्ताला पाहण्याची देवाला उत्सुकता वाटली व देव स्वयमेव भक्त पुंडलिकाकडे गेले. पूंडलिक सेवेत मग्न होता. त्याने देवाला उभे राहण्यासाठी वीट दिली व देव विटेवरी उभा राहिला. पुंडलिकाच्या या भावबळाचे संतांनी प्रेमभराने कौतुक केले आहे. थोडक्यात, वीरगळापासून लोक कथामिथांना धारण करुन, अनेक दैवताना स्वतःमध्ये सामावून घेऊन, हरिहराच्या ऐक्याचे प्रतीक म्हणून, श्रीकृष्णाचे बालरुप असलेला, मराठी, कानडी, तामीळ इत्यादी संस्कृतींचा संगम असलेले श्रीविठ्ठल एक महासमन्वय आहेत.

# शिक्षण क्षेत्रातील आधारवड , शिवाजीराव पाटील

विद्या विवादाय धनं मदाय खलस्य शक्ति: परपीडनाय साधोस्तु सर्वं विपरीतमेतत् ज्ञानाय दानाय च रक्षणाय सुभाषिताप्रमाणे आपल्या विद्येचा उपयोग दुसऱ्याच्या ज्ञानासाठी, आपल्याकडील पैशाचा उपयोग दानासाठी,आणि आपल्याकडे असणाऱ्या शक्तीचा उपयोग दुसऱ्याच्या रक्षणासाठी करणारे मुख्याध्यापक म्हणजेच शिवाजीराव पाटील त्यांनी शैक्षणिक नव्हे तर मराठा सेवा संघासह सामाजिक, सांस्कृतिक, अंधश्रद्धा निर्मूलन आश्या अनेक क्षेत्रात आपले अद्वितीय, अजरामर, अमर्यादित, असाधारण, कार्याचा ठसा उमटविला आहे. त्यांच्या सेवानिवृत्ती प्रसंगी त्यांच्या कार्याचा उजाळा व्हावा व त्यांच्या कार्यरूपी दिव्याचा प्रकाश सगळीकडे दरवळावा यासाठी केलेला हा छोटासा प्रयत्न. शिवाजी किसनराव पाटील यांचा जन्म 01 जून 1967 रोजी आलेगाव, ता. जि. नांदेड येथे शेतकरी कुटुंबात झाला. वडील किसनराव हे शेतकरी तर आई गोपाबाई ह्या गृहिणी होत्या. वारकरी संप्रदायाच्या संस्कारात वाढलेल्या या दांपत्याला पाच मुले आणि दोन मुली होती. सर्व मुलांमध्ये शिवाजीराव पाटील सर्वात लहान आहेत. लहानपणा पासून अतिशय बुद्धीने तल्लक, हुशार व हजर जबाबी होते. त्यामुळे वडिलांना वाटायचे की, यांनी शिक्षण घेऊन कुटुंबातील सदस्यांच्या आणि समाजाच्या कल्याणासाठी कार्य करावे.तिथून सरांची शैक्षणिक प्रवाहाची सुरुवात झाली. सरांची प्राथमिक शिक्षण, आलेगाव ता.जि. नांदेड येथे झाले. उच्च प्राथमिक शिक्षण, आसेगाव ता.वसमत येथे झाले. माध्यमिक शिक्षण महात्मा फुले विजयनगर, नांदेड येथे तर महाविद्यालयीन शिक्षण यशवंत कॉलेज, नांदेड या ठिकाणी झाले. त्यानंतर व्यावसायिक पदवी अर्थात बी. एड् हे शिक्षण यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक तर एम.एड्. हे शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठावाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी झाले. शिवाजीराव पाटील यांचे उच्च शिक्षण आणि उच्च गुणवत्ता पाहून त्यांना गावातील लाल बहादूर शास्त्री विद्यालय, निळा ता. जी.नांदेड येथे थेट मुख्याध्यापक म्हणून दिनांक 01/07/1989 रोजी नियुक्ती मिळाली. शाळेचा प्रारंभ असल्यामुळे सुरुवातीला एक खुर्ची ,एक लाकडी टेबल आणि इयत्ता आठवी आणि नववी दोन्ही वर्ग तुकड्या मिळून अशा 30 विद्यार्थ्या पासून सरांनी सुरुवात केली. सरांच्या आधी दोन शिक्षकांची नियुक्ती सुरुवातीला होती, परंतु सर आल्यामुळे ते दोन्ही शिक्षक लातूरला निघून गेले मग अशा कठीण परिस्थितीत मुलांना शिक्षण देण्यासाठी सरांनी मित्राच्या मदतीने सरांनी अध्यापनाचे कार्य सुरू ठेवले. शाळा ही विनाअनुदानित तत्त्वावर असल्यामुळे शाळेतील इतर शिक्षकांना सर आपल्या घरूनच जेवण्याची व्यवस्था करीत होते. एवढेच नव्हे शिक्षकांना आर्थिक पाठबळ मिळावा म्हणून सर रविवारी शाळेमध्ये चित्रफित (व्हिडिओ) चालवून रामायण ही मालिका दाखवीत असत त्यामुळे गावातील लोक ती मालिका पाहण्यासाठी येत, त्यावेळी प्रत्येक व्यक्तीकडून दोन रुपये असे मालिका बघण्याचे शुल्क घेण्यात येत असे आणि या पैशाचा उपयोग शिक्षकांना आणि शाळेची मूलभूत सोयी करण्यासाठी होत असे. असे सतत पाच वर्ष कुठलेही प्रकारचे मानधन न घेता सरांनी अध्ययन अध्यापनाचे कार्य आपल्या सहकार्याच्या माध्यमातून सतत केले .आणि त्याची पावती म्हणून दोन तुकड्याच्या तीन तुकड्यां आणि तीन तुकड्याच्या पाहता पाहता नऊ तुकड्या निर्माण झाल्या. आणि दहावीचा निकाल सुद्धा चांगला लागू लागला त्याची पावती म्हणून 1996 मध्ये ही शाळा 75 टक्के अनुदानावर आली. तुकोबाराय एका ठिकाणी म्हणतात,'' असाध्य ते साध्य| करिता सायास कारण अभ्यास|| या गाथेतील अभंगाप्रमाणे अनेक असाध्य गोष्टी सरांनी साध्य केल्या .लाल बहादूर शास्त्री विद्यालय, निळा या ठिकाणी दहावीचा निकाल शंभर टक्के लावून संपूर्ण पंचक्रोशी शाळेचे नावलौकिक वाढविला. शाळेबद्दलचा मुलांना वाटणारा आदर आणि पालकांचा विश्वास संपादन करून सरांनी अनेक शैक्षणिक उपक्रम शाळेत राबवली. आणि याची प्रचिती म्हणजे ग्रामीण भागातील पालकांनी जे मुले शहरात शिकण्यासाठी ठेवली होती त्यांनी लाल बहादूर शास्त्री, निळा या ठिकाणी प्रवेशित केले. ग्रामीण भागातील मुलांना केवळ विद्यादान महत्त्वाचे नसून त्यांच्या समस्या काय? त्यांची कौशल्य कोणती आहे? हे समजून घेण्याचा प्रयत्न सतत सरांनी केला. कौशल्य प्राप्त असणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्याचे काम सदैव सरांनी केले. आणि आपल्या कार्यात सदैव निपूणता यावी यासाठी यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा) पुणे या ठिकाणी सरांनी अनेक वेळा प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणाचा अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी केला. एवढेच नाही SERT पुणे या ठिकाणी सुद्धा सरांनी तीन वेळा प्रशिक्षण घेतले. मुंबई, पुणे, नगर,छत्रपती संभाजीनगर , अश्या अनेक ठिकाणी प्रशिक्षण घेऊन त्या प्रशिक्षणाचा फायदा आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना करून दिला. शिक्षण हे कसे उपयोगी आहे ते देण्याचा प्रयत्न सरांनी सदैव केला. आणि म्हणूनच सरांचे असंख्य विद्यार्थी आज उच्च गुणवत्ता प्राप्त आहेत. काही विद्यार्थी मोठ्या प्रशासकीय पदावर सुद्धा आहेत. काही विद्यार्थी समाज उपयोगी काम करीत आहेत. काही विद्यार्थी अनेक आघाडीवर सरांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करीत आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या परीक्षेमध्ये बसवून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीधारक बनवण्याचे कार्य सरांनी केले. शाळेला तालुक्यात नव्हे तर जिल्ह्यात नावलौकिकता मिळवून देण्याचे अथक प्रयत्न सरांनी केले. आणि म्हणूनच त्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे आकाशवाणी, नांदेड केंद्रातून विविध गुणदर्शक कार्यक्रम सतत प्रदर्शित होत असत.सरांचे व्यक्तिमत्व पाहता सरांनी अनेक आघाडीवर आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे. जसे समाजाचा विचार करता सामाजिक कार्य म्हणून त्यांनी अनेक समाज बांधवांना मदत केली आहे. मराठा सेवा संघाच्या चळवळीमध्ये सुद्धा ते हिरारीणे भाग घेऊन समाज उपयोगी ते कार्य करतात . पतसंस्थेचे चेअरमन असो वा नांदेड जिल्हा शिक्षण मंडळावर मिळालेली त्यांना पाच वेळेस संधी असो, गुणवत्ता वाढ कार्यक्रमासाठी त्यांचे मार्गदर्शन असो किंवा कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबविण्यासाठी त्यांची धडपड असो,



अनेक कार्यातून त्यांनी आपला एक वेगळा ठसा शिक्षण क्षेत्रात उमटविला आहे. म्हणून तत्कालीन जिल्हाधिकारी श्रीकर परदेशी सर यांनी त्यांच्याशी वैयक्तिक चर्चा करून कॉपी मुक्त अभियानासाठी त्यांच्या दालनात बोलावून कॉपी मुक्ति बाबत अर्धा तास चर्चा केली होती.अनेक समस्यां जाणून त्यांनी त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले. म्हणून विद्यार्थी प्रिय शिक्षक, मुख्याध्यापक म्हणून नावलौकिक मिळविला आहे. एवढेच नव्हे तर मुख्याध्यापक संघटनेचे उपाध्यक्ष म्हणून सुद्धा त्यांनी काम केले. अशा अनेक ठिकाणी सरांनी आपल्या कार्याची ओळख लोकांना करून दिली .एवढेच नाही, दुसऱ्यांच्या मदतीला सुद्धा सदैव तत्पर असतात,जसे एका गरीब विद्यार्थिनीला मदत मिळावी म्हणून अनेक समाज बांधवाकडून आर्थिक मदत देऊन त्या विद्यार्थिनींना शिक्षणाच्या प्रवाहात आणून आज ती विद्यार्थिनी पुणे येथे अभियंता आहे. अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम सरांनी केले.तसेच जाऊनिया तीर्था काय तुवां केले'' या उक्ती प्रमाणे कर्मकांडाला सदैव सरांनी विरोध केला, कर्मकांड करून आर्थिक नुकसान करण्यापेक्षा ज्या लोकांना पैशाची, वस्त्राची धान्याची गरज आहे .त्यांना ती मदत करणे म्हणजेच खरी ईश्वर सेवा आहे असे विचार सरांनी आपल्या कार्यातून मांडले. आणि म्हणूनच कर्मकांड न करता,वाढदिवस साजरा न करता मराठा महासंघाच्या मुलींच्या वस्तीगृहाला धनादेश नित्य देतात. असे सर्व आनंददायी जीवन असतांना अचानक दिनांक 01 मार्च 2022 रोजी सरांच्या पत्नी सौ छाया शिवाजीराव पाटील यांचे अचानक हृदयविकाराने निधन झाले. आणि सरांवर दुःखाचा डोंगर कोसळला पण त्या दुःखातही सरांनी स्वतःला सांभाळून पत्नीचे निधन ही बाब दूर सारून आपल्या मुलाला, मुलीला व आपल्या पुतण्यांना सरांनी आधार दिला.उच निच काही नेणे हा भगवंत| तिष्ठे भाव भक्त देखोनि या या अभंगाप्रमाणे कधीही उच, नीच असा भेदभाव केला नाही. सामाजिक प्रतिष्ठा न जपता सर्व समान आहेत. आणि सर्वांमध्ये मानवता हा गुण महत्त्वाचा आहे. असे विचार सरांनी आपल्या कार्यातून मांडले याची प्रचिती म्हणून छत्रपती शिवाजी महाराज जयंती असो,डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती असो, संत रोहिदास महाराज जयंती असो, महात्मा बसवेश्वर जयंती असो या निमित्त सर प्रमुख व्याख्याते म्हणून जातात. तसेच सरांच्या राहत्या घराच्या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधीचा वावर होता. तेथील लोकांच्या समस्या जाणून लोकसहभागातून मल निस्सारण वाहिनीचे काम सराच्या नेतृत्वात अनेक संकटे येऊन सुद्धा लोकसहभागातून 15 लक्ष रुपयाचे काम पूर्ण झाले. सरांचे वैयक्तिक जीवन सुद्धा सुंदर आहे सरांना एक मुलगा आणि एक मुलगी आहे.सरांची मुलगी सौ. शिल्पा दत्तात्रय कदम आणि जावई नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये चांगल्या पदावर आहेत. तर सरांचा मुलगा सुरज पाटील कष्टाळू, प्रामाणिक आणि वडिलांच्या पावलांवर पाऊल ठेवणार आहे. तसेच सरांचे सर्व पुतणे सुद्धा सरांच्या मार्गदर्शनानेच आपल्या क्षेत्रात यशस्वी आहेत.असे सरांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही अंग आहेत. सरांच्या प्रत्येक पैलूंचा उहापोहा केला तर नक्कीच शब्द कमी पडतील. असो. पुढील जीवन आपले सुख समाधानाचे, आपल्याला चांगले आरोग्य लाभो. आपल्या इप्सित इच्छा पूर्ण होवो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना. सर आपण 35 वर्ष 10 महिने अशी प्रदीर्घ अध्यापनाची व मार्गदर्शनाची सेवा पूर्ण करून आज 31 मे 2025 रोजी सेवानिवृत्त होत आहात ,आपल्याला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

**रुपेश मा.लांडगे**
**महात्मा बसेश्वर नगर,नांदेड**

# माहूरच्या घाटात कार दरीत कोसळली ६ भाविक जखमी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : श्रीक्षेत्र माहूर गडावरील श्री रेणुका माता मंदिरात दर्शनासाठी मंगरूळहून आलेले ६ भाविक कारने परत जात असताना जोराच्या पावसात रस्त्याचा अंदाज न आल्याने वळणावरून कार थेट दरीत कोसळली. जवळपास ४० ते ५० फूट खोल असलेल्या दरीत कोसळलेली कार झाडाला धडकून थांबल्याने भाविक बालंबाल बचावले. यातील जखमींवर ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. दि.२९-मे रोजी मध्यरात्री हा अपघात घडला.माहूर गडावरील श्री रेणुकामाता मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या घातक वळणावर ज्या ठिकाणाहून भगवान श्री परशुराम मंदिराकडे जाण्यासाठी रस्ता बनविण्यात आला आहे त्या वळणावर सार्वजनिक बांधकाम विभागाने लावलेल्या



संरक्षक प्लेटा काढल्या आहेत. त्यामुळे अनेक वाहनांना येथे अपघात झाले आहेत. दि.२८-मे पासून रात्री मान्सूनपूर्व अवकाळी पावसाचा प्रचंड जोर होता. त्यामुळे मंगरूळ येथील भाविकांना पावसामुळे वळणाचा अंदाज आला नाही. त्यामुळे वळण न घेता कार थेट दरीत उतरली. परंतु ही कार थेट झाडाला जाऊन धडकल्याने मुख्य रस्त्यापासून ३० ते ४० फूटावर उलटली. या अपघातात कारमधील सौरभ महेंद्र मरोडकर (वय २७), आकाश गजानन खालकोने (वय २८), सुयोग सुरेंद्र चव्हाण (वय २८), रोशन शरदराव मरोडक र (वय ३३), अक्षय प्रमोद हळदे (वय २७), भूषण संदीपराव पिंपळे (वय २५) सर्व रा. मंगरूळ दस्तगीर हे जखमी झाले. पावसामुळे बचावासाठी कोणीही नसल्याने त्यांनी कसेबसे रस्त्यावर येऊन खाजगी वाहनाद्वारे ग्रामीण रुग्णालय गाठले. येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ किरणकुमार वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ.अक्षय वाठोरे यांनी प्रथमोपचार करून त्यांना त्यांच्या गावी रवाना करण्यात आले.श्रीक्षेत्र माहूर शहरापासून ते रेणुका माता मंदिर आणि श्री दत्त शिखर संस्थान पर्यंतचा रस्ता अनेक ठिकाणी नादुरुस्त असून वळणावर संरक्षक भिंत किंवा संरक्षक कठडे नसल्याने अशा अपघातांना निमंत्रण मिळत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याची पाहणी करून तात्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.

# विभागीय आयुक्त दिलीप गावडे सेवानिवृत्त

## शासकीय सेवेत सर्वसामान्यांसाठी काम केल्याचा आनंद- दिलीप गावडे

छत्रपती संभाजीनगर : दि.30 :- मराठवाडयात विभागीय आयुक्त म्हणून काम करताना एक दिवस गावकऱ्यांसोबत, सस्ती अदालत, संवाद मराठवाडयाशी असे उपक्रम राबवून सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला. शासकीय सेवेत विविध पदावरून सर्वसामान्यांसाठी काम केल्याचा आनंद मिळाला अशी भावना विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी व्यक्त केली. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून विविध उपक्रम लोकाभिमूख करणारे अधिकारी अशी ओळख असणारे श्री. गावडे आज (31 मे) रोजी नियत वयोमानानूसार सेवा निवृत्त होत आहेत. विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात आयोजित निरोप समारंभात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्यासह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अंकित, अपर आयुक्त विजयसिंह देशमुख, डॉ. अनंत गव्हाणे, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, सहआयुक्त (नगर परिषद प्रशासन) देविदास टेकाळे, उप आयुक्त (आस्थापना) सुरेश बेदमुथा, विभागीय आयुक्त श्री. गावडे यांच्या पत्नी मनिषा गावडे यांच्यासह प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. श्री.गावडे म्हणाले, शासकीय सेवेत उपजिल्हाधिकारी पदावरून सुरूवात केली असून राज्यातील विविध विभागात 35 वर्ष सेवा केली आहे. सर्वसामान्य माणसासाठी काम करताना समर्मित भावनेने काम केले आहे. पुणे, सांगली, सातारा, अहिल्यानगर तसेच विदर्भातही काम




करण्याची संधी मिळाली. सेवानिवृत्त् होताना मराठवाडयात सेवा करण्याची संधी मिळाली, व या सेवेत कामाचा मोठा आनंद मिळाला. विभागातील प्रश्न सोडविण्यासाठी कमी वेळेत ऑनलाईन उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. सेवेत समवेत काम करणाऱ्या प्रत्येक अधिकारी तसेच नागरिकांनी सहकार्य केले असल्याचे सांगताना श्री. गावडे यांनी सेवा कालावधीतील प्रसंगानिहाय आपले अनुभव विषद केले. यावेळी विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विभागनिहाय अधिकारी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी अपर आयुक्त सुरेश वेदमुथा यांनाही सेवानिवृत्तीनिमित्त निरोप देण्यात आला. श्री वेदमुथा यांनी मराठवाडयात सर्व एकत्रितपणे काम करतात, याचा अनुभव आपल्याला आल्याचे सांगितले. पुणे जिल्हयातील गावडेवाडी सारख्या छोटे गाव ते विभागीय आयुक्त असा आयुक्तांचा प्रवास आमच्यसाठी प्रेरणा देणारा असल्याचे सांगितले. प्रास्ताविक अपर आयुक्त श्री परदेशी यांनी केले, त्यांनी श्री गावडे यांच्या सेवाकालावधी व त्यांनी राबविलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. यावेळी विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# राज्यात धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक 42.2 मिमी पाऊस


मुंबई, दि. ३० : राज्यात मागील २४ तासांमध्ये (३० मे रोजी सकाळपर्यंत) धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक ४२.२ मिमी पाऊस झाला आहे. तर बीड २४ मिमी, जालना १३.९ मिमी, सोलापूर १२.१ मिमी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात ११.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. राज्यात कालपासून आज ३० मे रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमीटरमध्ये) :- रायगड ०.३, रत्नागिरी ३.९, सिंधुदुर्ग ११.२, पालघर ०.१, नाशिक ०.६, धुळे ०.४, जळगाव ०.१, अहिल्यानगर ०.५, सोलापूर १२.१, सातारा १, सांगली ०.९, कोल्हापूर ०.८, छत्रपती संभाजीनगर ०.६, जालना १३.९,

# नाविन्यपूर्ण योजनांसाठी अर्ज प्रक्रिया सुरु




प्रतिनिधी,राज्यातील पशुसंवर्धन व ग्रामीण विकास विभागामार्फत गाय वाटप, म्हैस वाटप आणि कुक्कुटपालन यांसारख्या नाविन्यपूर्ण योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी व बेरोजगार युवक-युवतींसाठी ही योजना रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने मोठी संधी ठरणार आहे. या योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना गाई, म्हशी तसेच कोंबड्या अत्यंत सवलतीच्या दरात पुरवण्यात येणार आहेत. ही पावले ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहेत. अर्ज भरण्याची अंतिम तारीख २ जून असल्यामुळे इच्छुकांनी वेळेत ऑनलाईन अथवा स्थानिक ग्रामपंचायत/तालुका कार्यालयामार्फत अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# हवाई स्वप्नांना गती देणारा महापुरुष – विल्बर राईट



प्रतिनिधी,

३० मे १९१२ हा दिवस जागतिक विमान इतिहासासाठी एक शोकदायक वळण घेऊन आला होता, कारण ह्याच दिवशी हवाई जहाजाच्या शोधात क्रांती घडवणारे विल्बर राईट यांचे निधन झाले. ऑर्विल आणि विल्बर राईट या बंधूंनी जगातील पहिले यशस्वी मोटारचालित विमान निर्माण करून संपूर्ण मानवजातीला आकाशात झेप घेण्याचे स्वप्न दाखवले. विल्बर राईट यांचा जन्म १६ एप्रिल १८६७ रोजी, तर ऑर्विल यांचा जन्म १९ ऑगस्ट १८७१ रोजी अमेरिकेतील डेटन, ओहायो येथे झाला. त्यांच्या वडिलांनी दिलेल्या मशीनी खेळण्यांमुळे दोघांच्याही मनात यांत्रिकी संशोधनाची बीजे रोवली गेली. सुरुवातीला सायकल व्यवसाय करून त्यांनी हवाई संशोधनासाठी आर्थिक पाठबळ मिळवले. १७ डिसेंबर १९०३ रोजी किटी हॉक येथे त्यांनी त्यांच्या बनवलेल्या विमानाचे पहिले यशस्वी उड्डाण केले. ऑर्विलने १२ सेकंदात १२० फूट, तर विल्बरने ५९ सेकंदात ८५२ फूट अंतर पार केले. याच घटनेने हवाई प्रवासाचे स्वप्न सत्यात उतरवले. विल्बरच्या मृत्यूनंतर ऑर्विलने हवाई संशोधन चालू ठेवले. त्यांनी 'राईट कंपनी' स्थापून अनेक नव्या संकल्पनांची मांडणी केली. तसेच, NACA (सध्याचे NASA) या संस्थेचे ते संस्थापक सदस्य होते. त्यांच्या विज्ञानातील योगदानामुळे त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. आजही राईट बंधूंचे योगदान वैज्ञानिक विश्वात अमूल्य मानले जाते. त्यांच्या धाडसाने मानवाला आकाश गवसवले. दैनिक प्रजा-शासन परिवाराकडून विल्बर राईट यांना त्यांचा स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन!

# "31 मे जागतिक तंबाखू विरोधी दिन" निमित्त ब्रह्माकुमारीज पनवेल आणि पनवेल महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम

उरण दि ३० प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे )३१ मे रोजी साजरा होणाऱ्या जागतिक तंबाखू विरोधी दिन (World No Tobacco Day) निमित्त ब्रह्माकुमारीज पनवेल सेवाकेंद्राच्या वतीने आणि पनवेल महानगरपालिकेच्या सहकार्याने "आंतरराष्ट्रीय तंबाखू जनजागृती अभियान" अंतर्गत एक विशेष व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम ३० मे २०२५ रोजी जेष्ठ नागरिक सभागृह,सीनियर सिटिझन हॉल, ठाणे नाका रोड, ओल्ड पनवेल येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचा उद्देश तंबाखूसह सर्व प्रकारच्या व्यसनांचे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि कौटुंबिक स्तरावर होणारे दुष्परिणाम समजावून सांगणे व जनतेमध्ये जागरूकता निर्माण करणे हा होता. या उपक्रमात पनवेल महानगरपालिकेचे सुमारे २५० कर्मचारी, यामध्ये आशा वर्कर्स, डॉक्टर, नर्सेस यांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते व मार्गदर्शक होते डॉ. सचिन परब (MBBS), जे ब्रह्माकुमारीज संस्थेशी संलग्न असून प्रसिद्ध हिप्नोथेरपिस्ट,



काउन्सेलर आणि कॉर्पोरेट ट्रेनर आहेत. त्यांनी आजवर अनेक व्यसनमुक्ती शिबिरे यशस्वीपणे पार पाडली असून त्यांना महाराष्ट्र शासनाचा "महात्मा गांधी व्यसनमुक्ती पुरस्कार" देखील प्राप्त झाला आहे. ते "ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑन टोबॅको अवेअरनेस" या आंतरराष्ट्रीय उपक्रमाचे प्रोजेक्ट डायरेक्टर असून "माय इंडिया ॲडिक्शन फ्री इंडिया" या राष्ट्रीय मोहिमेचे नॅशनल को-ऑर्डिनेटर देखील आहेत. डॉ. परब यांनी व्यसनामुळे होणारे वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक नुकसान समजावून देत, व्यसनमुक्तीची प्रेरणा दिली. त्यांच्या प्रभावी सत्रानंतर सर्व सहभागी सदस्यांनी आपल्या घर, कार्यस्थळ, शहर, राज्य, देश आणि अखेर संपूर्ण जग व्यसनमुक्त करण्याची प्रतिज्ञा घेतली.कार्यक्रमाच्या शेवटी ब्रह्माकुमारीज पनवेल सेवाकेंद्रात चालणाऱ्या सात दिवसांच्या मोफत राजयोग ध्यान अभ्यासक्रमाची माहिती देण्यात आली. तसेच, इच्छुकांना डॉ. परब यांच्याकडून मोफत समुपदेशनाची सुविधा देखील उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. या सेवेसाठी आवश्यक संपर्क क्रमांक उपस्थितांना प्रदान करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहात पार पडला असून "तंबाखू मुक्त भारत" घडविण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल टाकले गेले.

# जागतिक तंबाखू मुक्ती दिनानिमित्त मंत्रालयात जनजागृती कार्यक्रम
# तंबाखूचे अतिसेवन म्हणजे अनंत आजारांना निमंत्रण

मुंबई, दि. ३० : जागतिक तंबाखू मुक्ती दिनानिमित्त सामाजिक न्याय विभागाअंतर्गत कार्यरत नशाबंदी मंडळामार्फत राज्यभर तंबाखू प्रतिबंध उपक्रम राबविण्यात येत आहे. तंबाखूच्या अतिसेवनामुळे होणाऱ्या गंभीर आजारांविषयी जनजागृती करत लोकांना नशा मुक्त जीवन जगण्याचे आवाहन या उपक्रमात करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन आरोग्य विभागाचे सचिव निपुण विनायक यांच्या हस्ते मंत्रालयात करण्यात आले. मुंबईतील केईएम रुग्णालय, सायन रुग्णालय व सेंट जॉर्ज रुग्णालयातील डॉक्टरांच्या उपस्थितीत नागरिकांना तंबाखू व इतर व्यसनांच्या दुष्परिणामांविषयी सखोल माहिती देण्यात आली.



या कार्यक्रमात तंबाखू, धूम्रपान, अल्कोहोल व ड्रग्सच्या व्यसनांपासून मुक्त होण्यासाठी विविध उपाययोजनांची माहिती देण्यात आली. व्यसनमुक्तीसाठी सल्ला व मार्गदर्शन केंद्रांची स्थापना, 'मॅजिक जार' संकल्पना, तसेच सतत तणावाखाली राहणाऱ्यांसाठी समुपदेशन सुविधा यांसारखे उपक्रम यावेळी राबविण्यात आले. यावेळी तज्ज्ञांनी सांगितले की, तंबाखूमुळे केवळ कर्करोग होण्याची शक्यता वाढत नाही तर मेंदूच्या कार्यावरही त्याचा विपरित परिणाम होतो. त्यातील निकोटीन हे रसायन शरीरातील इन्सुलिनचे प्रमाण कमी करते, ज्यामुळे मधुमेह होण्याचा धोका वाढतो. धूम्रपान करणाऱ्यांचे फुफ्फुस हे इतरांच्या तुलनेत कमी कार्यक्षम असते, तर अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे यकृताचे विकार उद्भवू शकतात. या उपक्रमात व्यसनमुक्ती केंद्र, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, सलाम मुंबई फाउंडेशन यांसारख्या अनेक नशामुक्ती संस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवला. विविध सादरीकरणे व खेळांच्या माध्यमातून या संस्थांनी व्यसनमुक्तीचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवला. तंबाखू विक्रीवरील कायदेशीर मर्यादा, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि शाळा, महाविद्यालये तसेच गर्दीच्या ठिकाणी वर्षभर राबविण्यात येणाऱ्या जनजागृती उपक्रमांची माहितीही यावेळी देण्यात आली. राज्य नशाबंदी मंडळाच्या पुढाकाराने राबविण्यात आलेला हा उपक्रम तंबाखूविरोधी लढ्यास नवे बळ देणारा ठरला असून, नागरिकांनीही या मोहिमेत सहभागी होऊन स्वतःच्या आरोग्यासाठी तंबाखूला नकार द्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# विद्यार्थीनीकडून डॉ. सत्येंद्र राऊत सन्मानित

तुळजापूर तालुक्यातील शैक्षणिक, सामाजिक व सिने क्षेत्रात नेहमी अग्रेसर असणारे अणदूर येथील जवाहर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. सत्येंद्र राऊत यांना कोल्हापूर येथे विविध गुणात्मक कार्याबद्दल राष्ट्रीय समाजभूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. प्रा. डॉ. सत्येंद्र राऊत यांनी आत्तापर्यंत अनेक विविध शैक्षणिक व सामाजिक कार्यातून आपला ठसा उमठवला आहे. राऊत यांना आतापर्यंत दीडशेपेक्षाही अधिक पुरस्कार मिळाले आहेत. किल्ले पर्यटन महोत्सव सेवा संस्था, महाराष्ट्र, कोल्हापूर येथील जिद्द फाउंडेशन



यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय लक्षवेध सामाजिक संमेलन २०२५ या कार्यक्रमात लोकशिक्षण, लोकप्रबोधन व जनजागृती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावल्याबद्दल अभिनेता स्वप्नील राजशेखर,




अभिनेत्री शुभांगी व संयोजक डॉ. बी. एन. खरात यांच्या हस्ते प्रा. डॉ. सत्येंद्र राऊत यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल जवाहर महाविद्यालयातील बी. ए. प्रथम वर्षात खास संस्कृत भाषेतून शिक्षण घेत असलेली विद्यार्थीनी सौ.प्रगती ज्योतिर्लिंग शिंदे व त्यांच्या कुटुंबाच्यावतीने प्रा. राऊत यांचा हार, शाल व बुके देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व अनेक विद्यार्थी उपस्थित होते. अशा विशेष पुरस्कारामुळे विद्यार्थांना अतिशय आनंद झाला. अशा आगळावेगळा सत्कार सोहळा विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा असून शैक्षणिक क्षेत्रात कौतुक होत असून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवराकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# डॉ. रमेश पानसे यांना पु. ग. वैद्य कार्यगौरव पुरस्कार जाहीर

7 जून रोजी गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते वितरण

पुणे : बाल साहित्यातील मातृ संस्था असलेल्या आणि सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरा करत असलेल्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे देण्यात येणारा पु.ग. वैद्य कार्यगौरव पुरस्कार ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ ग्राममंगलचे संस्थापक डॉ. रमेश पानसे यांना जाहीर झाला आहे. येत्या 7 जून रोजी सायंकाळी 6 वाजता पत्रकार भवनात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी संमेलनाध्यक्ष व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक भारत सासणे असणार आहेत. तर पु. ग. वैद्य यांच्या पत्नी वसुंधरा वैद्य यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू व कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी यांनी दिली. पु. ग. वैद्य यांच्या नावाने दिला जाणारा हा पहिला 'कार्यगौरव पुरस्कार' आहे. मराठी बालसाहित्यकार अमरेंद्र लक्ष्मण गाडगीळ आणि त्यांचे सहकारी भा. रा. भागवत, सुधाकर प्रभू, श्यामला शिरोळकर, श्रीधर राजगुरू, लीला दीक्षित इत्यादींनी ऑगस्ट 1975 मध्ये 'अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे' या संस्थेची स्थापना केली. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन, राज्यस्तरीय बालसाहित्य पुरस्कार, बालसाहित्य व इतर क्षेत्रांत मुलांसाठी भरीव कार्य करत असलेल्या व्यक्तीस जीवनगौरव पुरस्कार, मुलांना वाचनाची गोडी लावणे, मुलांसाठी व प्रौढांसाठी बालसाहित्य



लेखन कार्यशाळा घेणे, मुलांमध्ये भाषा व साहित्याची आवड निर्माण करणे, उत्तम व सकस बालसाहित्याची निर्मिती करून ते अल्प किंमतीत वितरित करणे अशा अनेक उपक्रमांच्या माध्यमातून मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यांचे जतन व संवर्धन करण्याचे काम ही संस्था गेली 50 वर्षे करत आहे. जीवनगौरवचे यंदापासून नाव बदलले ऑगस्ट, 2024 पासून संस्थेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष सुरू झाले आहे. या आधी जीवनगौरव या नावाने दिल्या जाणाऱ्या पुरस्काराचे नाव या वर्षापासून ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ 'पु. ग. वैद्य कार्यगौरव पुरस्कार' असे करण्यात आले आहे. पु. ग. वैद्य हे 'बालकुमार साहित्य संस्थे'चे अनेक वर्षे अध्यक्ष होते. धडपड व्यासपीठ, आचार्यकूल, पालक शिक्षक संघ, पुणे मनपा शिक्षण मंडळ, बालकुमार साहित्य संस्था, ज्ञानदा प्रतिष्ठान, ज्ञानेश्वर विद्यापीठ, किशोरमित्र (मासिक), महाराष्ट्र राज्य गणित महामंडळ अशा कितीतरी संस्थांशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते होते. शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक या क्षेत्रातील त्यांचे योगदान मोलाचे आहे.

# राज्य, धर्म व भाषेपेक्षा अधिक मातृभूमीचा अभिमान बाळगावा

## - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन राजभवन येथे गोवा व तेलंगणा राज्य स्थापना दिवस साजरा

## उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल राज्यपालांकडून स्वारातीमच्या विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप

मुंबई, दि. 30 : गोवा राज्याच्या मूळ लोकसंस्कृतीचे संगीत व लोककलेच्या माध्यमातून उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी त्यांनी प्रत्येकाने आपल्या राज्याचा, धर्माचा व आपल्या भाषेचा अभिमान अवश्य बाळगला पाहिजे परंतु सर्वाधिक अभिमान मातृभूमीचा बाळगला पाहिजे, असे सांगितले.

राजभवन येथे राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत गोवा राज्य स्थापना दिवस (30 मे) तसेच तेलंगणा राज्य स्थापना दिवस (2 जून) संयुक्तरित्या साजरा करण्यात आला, त्यावेळी राज्यपाल बोलत होते.

उभय राज्यांचे राज्य स्थापना दिवस हे भारत सरकारच्या 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमाचा भाग म्हणून साजरे करण्यात आले. गोवा राज्य स्थापना दिनाचे आयोजन महाराष्ट्र राजभवनाने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (स्वारातीम) यांच्या सहकार्याने केले होते, तर तेलंगणा राज्य स्थापना दिनाचे आयोजन मुंबई आंध्र महासभा व जिमखाना या संस्थेच्या सहकार्याने करण्यात आले. गोवा म्हटले की लोकांना पाश्चात्य संस्कृती आठवते. परंतु स्वारातीमच्या विद्यार्थ्यांनी गोव्याचे ढालो नृत्य व दिवली नृत्य सादर करून तेथील मूळ भारतीय संस्कृतीची आठवण करून दिली. हे सादरीकरण अपूर्व होते या शब्दात राज्यपालांनी स्वारातीमच्या विद्यार्थ्यांना तसेच सांस्कृतिक चमूला कौतुकाची थाप दिली. प्रसिद्ध कुचिपुडी नृत्यांगना नादिया हिने 'नटराज नाट्यहेला' शास्त्रीय नृत्य सादर करून मंत्रमुग्ध केले या शब्दात



राज्यपालांनी तिचे कौतुक केले. युरोप मधील देशांमध्ये भाषिक विविधता आहे. तेथील देशांनी सामायिक हितासाठी युरोपियन युनियन तयार केली. भारतात अनेक राज्ये व अनेक भाषा आहेत. या सर्व राज्यांमधील सांस्कृतिक एकता हे आपले बलस्थान आहे. या एकतेमुळेच भारताचे आज जगात महत्त्व आहे, असे सांगून जगाशी स्पर्धा करण्यासाठी ही एकता टिकवली पाहिजे. सन २०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र म्हणून उदयास येईल. मात्र जगावर राज्य न गाजवता भारत आपल्या शक्तीचा वापर मानवतेची सेवा करण्यास करील, असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते स्वारातीमचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांचा तसेच मुंबई आंध्र महासभेचे अध्यक्ष एम. कोंडा रेड्डी यांचा सत्कार करण्यात आला. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी प्रास्ताविक केले तर कक्ष अधिकारी जयेश ठाकूर यांनी आभार मानले. यावेळी मुंबईतील तेलंगणाच्या महिलांनी तेलंगणाचे बथकम्मा नृत्य सादर केले. या कार्यक्रमात दोन्ही राज्यांचा इतिहास आणि वारसा दर्शविणारे लघुपट दाखवण्यात आले. स्वारातीमचे प्रकुलगुरु डॉ. अशोक महाजन, मुंबई आंध्र महासभा आणि जिमखान्याचे सरचिटणीस यापुरम वेकटेश्वर, राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती, स्वारातीम विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व विद्यार्थी आणि मुंबईत राहणारे मूळचे तेलंगणा राज्याचे गणमान्य नागरिक उपस्थित होते.




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

## आंतरराष्ट्रीय



# पाकिस्तानचं मोठं शहर बलुच आर्मीच्या ताब्यात; बलुच बंडखोर शहरात घुसताच पोलीस पळाले

बलुचिस्तानमधील परिस्थिती आता पाकिस्तान सरकारच्या नियंत्रणाबाहेर जाताना दिसत आहे, सशस्त्र बलुच बंडखोरांनी शुक्रवारी पाकिस्तानमधील महत्त्वाचं शहर असलेलं सोराब शहर ताब्यात घेतल्याची माहिती समोर येत आहे, यासंदर्भात बलुच बंडखोरांकडून शहर ताब्यात घेण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार बलुच बंडखोर शस्त्रांसह सोराब शहरामध्ये घुसले त्यांनी या शहरांमधील अनेक सरकारी कार्यालयं आपल्या ताब्यात घेतली आहेत, ज्यामध्ये पोलीस स्टेशन, बँक आणि इतर काही महत्त्वाच्या सरकारी कार्यालयाचा समावेश आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या बलुच बंडखोरांनी तिथे उपस्थित असलेल्या पोलिसांना आणि सुरक्षा रक्षकांना पळून लावलं आहे. कुठलाही गोळीबार किंवा संघर्ष न करता पोलीस आणि सुरक्षा रक्षक घटनास्थळावरून निघून गेल्याची माहिती देखील समोर येत आहे, त्यानंतर या बलुच बंडखोरांनी सोराब शहरातील सरकारी कार्यालयांचा ताबा घेतला. पाकिस्तान सरकारला देखील काहीच करता आलं नाही. बलुच लिबरेशन आर्मी (BLA) ने केलेल्या दाव्यानुसार त्यांनी पाकिस्तानमधील सोराब शहर



ताब्यात घेतलं आहे, शहरावर पूर्णपणे नियंत्रण मिळवलं आहे. येथील बँकेसह, पोलीस स्टेशन आणि इतर महत्त्वाची सरकारी कार्यालयं बलुच आर्मीने ताब्यात घेतली आहेत.आम्ही लवकरच या संदर्भातील सविस्तर माहिती सांगू असं बलुच लिबरेशन आर्मीचा प्रवक्ता जियंद बलोच यांने म्हटलं आहे. सोराब शहर पाकिस्तानसाठी किती महत्त्वाचं? सोराब हे पाकिस्तानमधील अत्यंत महत्त्वाचं शहर आहे कारण हे शहर क्वेटा आणि कराची या पाकिस्तानमधील दोन प्रमुख शहरांना जोडणाऱ्या महामार्गावर येतं. त्यामुळे रणनितीच्या दृष्टीकोणातून हा परिसर पाकिस्तानसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. सुराब या शहरावर बलुच बंडोखोरांनी नियंत्रण मिळवलं याचा अर्थ आता क्वेटा आणि कराची या दोन शहरांमध्ये सुरू असलेले दळणवळण देखील बलुच लिबरेशन आर्मीच्या नियंत्रणात आलं आहे. दरम्यान दुसरीकडे गुरुवारी अफगाणीस्तानचं सैन्य पाकिस्तानमध्ये घुसलं होतं. सीमावर्ती भागात जोरदार गोळीबार झाल्याची माहिती देखील मिळत आहे, या घटनेत पाकिस्तानचे काही सैनिक मारले गेल्याचं देखील वृत्त आहे, मात्र याला पाकिस्तानकडून अद्याप कोणताही अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही.

## पाकला तुम्ही दिलेली शस्त्र कुचकामी कशी निघाली? चिनी प्रवक्त्याचं अजब उत्तर

ऑपरेशन सिंदूरच्यावेळी पाकिस्तानने चीनकडून त्यांना मिळालेली शस्त्र, मिसाइल्स भारतावर डागली. यातले काही मिसाइल्स टार्गेटपर्यंत पोहोचून फुस्स झाली. फुटलेच नाही. चीनच PL-15E हे रडार संचलित बियॉन्ड विजुअल रेंज मिसाइल असच एक शस्त्र आहे. भारताच्या एअर डिफेन्स सिस्टिमने या PL-15E मिसाइलच्या अशाच अक्षरक्ष: चिंधड्या उडवल्या. चीनला हे सत्य पचवण खूप जड जातय. त्यांचं हे कथित सुपर ब्रांड मिसाइल फेल गेलं. चिनी सैन्याला नुकतच भारत-पाकिस्तान संघर्षातील त्यांच्या शस्त्रांच्या प्रदर्शनाबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी त्यांनी वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न केला. चिनी प्रवक्त्याने या प्रश्नावर थेट उत्तर देणं टाळलं. त्याला काही सूचलं नाही, तेव्हा त्याने डिप्लोमसीच ज्ञान देण्याचा प्रयत्न केला. या संघर्षाला 20 दिवस झालेत. दिवसागणिक चिनी शस्त्र किती निष्प्रभावी ठरलीत, त्याची माहिती समोर येत आहे. चिनी संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते सीनियर कर्नल झांग जियाओगांग यांना पत्रकारांनी PL-15E मिसाइल बद्दल विचारलं. चीन PL-15E मिसाइल आपलं अत्याधुनिक रॉकेट असल्याच सांगतो. पण या Advance रॉकेटचा पाकिस्तानने भारताविरोधात वापर केला, तेव्हा ते फुटलच नाही. मिसाइल




का फुटलं नाही? त्याचं उत्तर नाही भारतीय अधिकाऱ्यांना एक संपूर्ण PL-15E मिसाइल मिळालं. 9 मे 2025 रोजी पंजाबच्या होशियारपूरमध्ये हे मिसाइल मिळालं. पाकिस्तानने या मिसाइलने भारतावर हल्ला केला होता. या मिसाइलबद्दल चीनच्या संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते सीनियर कर्नल झांग जियाओगांग यांना प्रश्न विचारला. त्यावर ते एवढच बोलले, तुम्ही ज्या मिसाइलचा उल्लेख करताय, ते निर्यात केलं जाणारं शस्त्र आहे. हे मिसाइल देश-विदेशात अनेक संरक्षण प्रदर्शनात मांडण्यात आलं आहे. चीनचं हे सर्वात अत्याधुनिक मिसाइल का फुटलं नाही? त्याचं उत्तर मात्र झांग देऊ शकले नाहीत. काय खास आहे PL-15E मिसाइलमध्ये? PL-15E हे एक लांब पल्ल्याच हवेतून हवेत मारा करणारं क्षेपणास्त्र आहे. हे चीनच्या 607 इंस्टीट्यूटने विकसित केलं आहे. हे मिसाइल चायना एयरोस्पेस सायन्स अँड इंडस्ट्री कॉर्पोरेशन (CASIC) बनवते. हे रडार संचलित मिसाइल असल्याचा चीनचा दावा आहे. यात डुअल-पल्स सॉलिड-प्रोपेलेंट रॉकेट मोटर आहे, ज्यामुळे याला Mach 5 पेक्षा जास्त स्पीड आणि 145 किलोमीटरची रेंज मिळते.

## रशियाने उत्तर कोरियासाठी पाठवले ब्राह्मोस पेक्षा वेगाने जाणारे क्षेपणास्त्र, पुतिन यांच्याकडून अमेरिकेला धक्का



रशिया आणि उत्तर कोरिया यांच्यातील वाढत्या लष्करी नात्यासंदर्भात एक रिपोर्ट समोर आला आहे. रशियाने उत्तर कोरियाला आपले एअर डिफेन्स सिस्टम, इलेक्ट्रॉनिक जॅमर आणि इतर सैनिक मदत दिली आहे. एका आंतरराष्ट्रीय रिपोर्टमधून हा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाकडून उत्तर कोरियावर प्रतिबंध असताना हे सर्व होत आहे. एका प्रकारे व्लादिमीर पुतिन यांनी अमेरिकेला धक्का दिला आहे.उत्तर कोरियाला रशियाने सैन्य मदत दिल्याबद्दल बहुपक्षीय देखरेख समूहाने (Multilateral Sanctions Monitoring Team) दिलेल्या अहवालात दावा केला आहे. त्यात म्हटले आहे की, नोव्हेंबर 2024 पासून किंवा त्यापूर्वी रशिया उत्तर कोरियाला सैन्य मदत देत आहे. उत्तर कोरियाला रशियाने पॅंटीर मोबाइल संरक्षण प्रणाली, लढाऊ विमाने दिली आहे. ही प्रणाली जमिनीवर हवेत मार करण्यासाठी ओळखली जाते. शत्रूचे विमान अवकाशात नष्ट करण्याची क्षमता या प्रणालीत आहे.पॅंटीर डिफेन्स सिस्टमच्या क्षेपणास्त्राची स्पीड ब्राह्मोसपेक्षाही जास्त आहे. परंतु ब्रह्मोस आणि त्याची तुलना करता येणार नाही. कारण पॅंटीर एक शॉर्ट रेंज एअर डिफेन्स प्रणाली आहे. दुसरीकडे ब्राह्मोस सुपरसॉनिक


## सलमान खुर्शीद यांनी कलम 370 वर मोदी सरकारचे केले कौतूक



ऑपरेशन सिंदूरनंतर खासदारांचे शिष्टमंडळ विविध देशांमध्ये गेले आहे. या शिष्टमंडळातील खासदार पाकिस्तानकडून दहशतवाद्यांना दिली जाणारी मदत याबाबत जगभरात माहिती देत आहे. काँग्रेस नेते सलमान खुर्शीद इंडोनेशिया दौऱ्यावर आहेत. यावेळी इंडोनेशियामध्ये बोलताना त्यांनी सांगितले की, कलम 370 मुळे काश्मीर भारतापासून वेगळे असण्याची भावना होती. केंद्र सरकारकडून हे कलम रद्द केल्यानंतर ही भावना संपली. मूळ समस्याच नष्ट झाली.सलमान खुर्शीद यांनी काश्मीरमधील कलम 370 रद्द केल्यानंतर अनेक सकारात्मक बदल झाल्याचे सांगितले. ते म्हणाले, काश्मीरमधील कलम 370 रद्द झाल्यानंतर निवडणुका झाल्या. त्या निवडणुकांमध्ये 65 टक्के मतदारांनी सहभाग घेतला. आता काश्मीरमध्ये लोकशाही पद्धतीने निवडून आलेले सरकार आहे. काश्मीरचा विकास झाला आहे. काश्मीरमध्ये समृद्धी आली आहे.

# मी केवळ दहशतवादी हल्ल्याच्या: शशि थरूर यांची ऑपरेशन सिंदूरवरील भूमिका आणि त्याचे परिणाम काय?

ऑपरेशन सिंदूरनंतर भारताने एक मोठा निर्णय घेतला आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये काय झालं होतं? भारताला पाकिस्तानवर हल्ला का करावा लागला? हल्ल्यानंतर पाकिस्तानचे दहशतवाद्यांशी संबंध असल्याचं कसं उघड झालं? याची माहिती जगाला देण्यासाठी भारताने जगातील काही प्रमुख देशात खासदारांचं प्रतिनिधी मंडळ पाठवलं आहे. एका शिष्टमंडळाचं नेतृत्व काँग्रेसचे नेते शशि थरूर करत आहेत. काँग्रेसने नाव दिलेलं नसतानाही थरूर यांचा भाजपने या



शिष्टमंडळात समावेश केला आहे. त्यावरून थरूर यांच्यावर टीका होत आहे. पण थरूर यांनी त्याला सडेतोड उत्तर दिलं आहे. तसेच ऑपरेशन सिंदूरबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्याचे परिणामही दिसून येत आहेत.

शशि थरूर यांची काही विधाने चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आली आहेत. त्यावरही त्यांनी भाष्य करत ऑपरेशन सिंदूर बाबतची भूमिकाच स्पष्ट केली आहे. पनामामध्ये एका दीर्घ आणि यशस्वी दिवसानंतर मला अर्ध्या रात्री इथून निघून सहा तासानंतर कोलंबियामध्ये बोगोटासाठी जायचं आहे. माझ्याकडे वास्तवात वेळ नाहीये. पण तरीही, ज्या कट्टरपंथीयांसाठी जे भूतकाळात LoC च्या पलिकडे भारताच्या शौर्यावरील माझ्या कथित अज्ञानतेवर भडकले आहेत 1) मी स्पष्टपणे दहशतवादी हल्ल्याच्या प्रतिशोधाच्या बाबत बोलत होतो, मागच्या युद्धाच्या बाबत नाही. 2) माझ्या टिप्पणीपूर्वी मी अलीकडील काही वर्षांत झालेल्या हल्ल्यांचा संदर्भ दिला होता, ज्यावेळी भारताने LoC आणि आंतरराष्ट्रीय सीमेबाबत असलेल्या आपल्या जबाबदार आणि सन्मानपूर्वक दृष्टिकोनामुळे संयम बाळगला आणि मर्यादित प्रतिसाद दिला. पण नेहमीप्रमाणे, टीकाकार आणि ट्रोल्स यांनी माझ्या विचारांना आणि शब्दांना तोडून-मोडून मांडले, आणि ते चालू द्या – त्यांचे स्वागत

# पाकिस्तान नाही सुधारणार, इतका मार खाऊन पुन्हा तीच चूक, हा फोटो बघा, सगळं समजेल

ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताकडून जोरदार मार खाऊनही पाकिस्तान अजून सुधरत नाहीय. पाकिस्तानने पुन्हा एकदा स्टेट स्पॉन्सर टेररचे आरोप सिद्ध केले आहेत. पाकिस्तानातून एक नवीन फोटो समोर आलाय, त्यात लष्करचे दहशतवादी आणि शहबाज शरीफ यांचे मंत्री एका स्टेजवर एकत्र दिसतायत. पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात 28 मे रोजी यौम-ए-तकबीरच्या निमित्ताने एका कार्यक्रमाच आयोजन झालं. या दिवशी 1998 साली पाकिस्तानने बलूचिस्तानच्या चगाई येथे




अणूबॉम्बची चाचणी केली होती. पाकिस्तान अणवस्त्र संपन्न देश बनला होता. यौम-ए-तकबीरच्या या कार्यक्रमात लष्करच्या खतरनाक दहशतवाद्यांसह शहबाज शरीफ यांचे मंत्री एका मंचावर उपस्थित होते. पाकिस्तानचे खाद्य मंत्री मलिक राशिद अहमद खान आणि पंजाब असेंबलीचे स्पीकर मलिक मुहम्मद अहमद खान, लश्कर-ए-तैयबाचा दहशतवादी सैफुल्लाह कसूरी, हाफिज सईदचा मुलगा तल्हा सईद आणि आमिर हमजा शेजारी-शेजारी बसले होते. हे दोन्ही मंत्री पंतप्रधान शहबाज यांचे निकटवर्तीय मानले जातात. या मंत्र्यांकडून स्टेजवर दहशतवाद्यांचे स्वागत या कार्यक्रमात दहशतवादाच उदात्तीकरण करण्यात आलं. भारताविरोधात चिथावणीखोर भाषणं देण्यात आली. दहशतवाद्यांपासून अंतर ठेवण्याऐवजी शहबाज यांचे हे मंत्री स्टेजवर दहशतवाद्यांचा स्वागत करत होते, त्यांची गळाभेट घेतली. पाकिस्तानच्या संरक्षणात या दहशतवाद्यांच्या भूमिकेच कौतुक केलं. सैफुल्लाह कसुरीची उपस्थिती शहबाज यांचे मंत्री मलिक राशिद यांनी खुलेआम घोषणा केली की, पाकिस्तानच्या 24 कोटी लोकांच प्रतिनिधीत्व हाफिज सईद आणि सैफुल्लाह कसूरीसारखे लोक करतात. या कार्यक्रमात पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड सैफुल्लाह कसुरीची उपस्थिती हैराण करणारी होती. खलिस्तानच्या समर्थनात घोषणाबाजी

कसूरी पहलगाम हल्ल्यानंतर अंडरग्राऊंड झाला होता. कसूरी 24 मिनिटांच द्वेषपूर्ण भाषण केलं. तो छाती फुगवून बोलत होता, पहलगाम हल्ल्यासाठी मला जबाबदार धरण्यात आलं, आता सगळ्या जगाला माझं नाव माहित आहे. यावेळी लश्कर-ए-तैयबाचा सहसंस्थापक आमिर हमजाने खलिस्तानच्या समर्थनात घोषणाबाजी केली. सोशल मीडियावर व्हायरल होणारे हे फोटो आणि व्हिडिओमधून ISI आणि लश्करच्या प्रोपेगेंडाच्या संबंधांची पुष्टि होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com